Literacy for a Billion

Movie: Maherchi Manse
Year: 1984

Song: Hi Ratra Milanachi
Lyricist: Sudhir Moghe

ही रात्र मिलनाची
ही रात्र मिलनाची
संपेल ना कधीही
माझ्या तुझ्या जगाचा
स्वप्नात अंत नाही
ही रात्र मिलनाची
संपेल ना कधीही
ही रात्र मिलनाची

आकाश दूर तेथे
झुकले जरा धरेशी
आकाश दूर तेथे
झुकले जरा धरेशी
वेली सुखावलेल्या
बिलगुनिया तरूशी
माझे तुझेच प्रेम
माझे तुझेच प्रेम
खुलते इथे तिथेही
ही रात्र मिलनाची
संपेल ना कधीही
ही रात्र मिलनाची

हे हात गुंफिलेले
अन् श्वास गुंतलेले
हे हात गुंफिलेले
अन् श्वास गुंतलेले
झाले परस्परांचे
उरले न् वेगळाले
माझ्या तुझ्यात आता
माझ्या तुझ्यात आता
ना दूरता कुठेही
ही रात्र मिलनाची
संपेल ना कधीही
ही रात्र मिलनाची

नाते असे जुळे की
जे ना कधी तुटेल
नाते असे जुळे की
जे ना कधी तुटेल
संसारवेल अपुली
बहरेल अन् फुलेल
माझी तुझीच आण
माझी तुझीच आण
आहे तुला मला ही
ही रात्र मिलनाची
संपेल ना कधीही
ही रात्र मिलनाची
माझ्या तुझ्या जगाचा
स्वप्नात अंत नाही
ही रात्र मिलनाची

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*